सन २०१७-१८ मध्ये प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत बाबुलनाथ मंदिर, जि.मुंबई शहर येथील विकास कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : टीडीएस २०१८/१२/प्र.क्र.११२५/पर्यटन,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०१ मार्च, २०१९.

वाचा : १) शासन निर्णय, समक्रमांक, दिनांक १८.१२.२०१८.
२) जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे पत्र क्रमांक- जिनिस-३/जिवायो/पर्यटन/२०१८-१९/२३१, दिनांक २.२.२०१९.

शासन निर्णय :

जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या उपरोक्त संदर्भाधीन दिनांक २.२.२०१९ च्य पत्रान्वये बाबुलनाथ मंदिर, मुंबई शहर येथील विकास कामांना मान्यता देण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.

२. त्यानुसार बाबुलनाथ मंदिर, मुंबई शहर येथील रुपये २००.०० लक्षच्या खालील नमूद केलेल्या विकास कामांना या शासन निर्णयान्वये तांत्रिक मान्यतेच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

अ.क्र.	कामाचे नांव	अंदाजित किंमत (रुपये लाखात)
१	सिक्युरीटी कॅबीन ते गणपती मंदिरापर्यंत पायवाटा बनविणे व सौंदर्यीकरण करणे	४०.००
२	उद्वाहनाजवळील परिसरात पायवाटा बनविणे व सौंदर्यीकरण करणे	२०.००
३	नविन ड्रेनेज लाईन टाकणे	२०.००
४	मोकळ्या परिसरात मँग्लार टाईल्सचे खुले शेड बांधणे	२०.००
५	प्रवेशद्वाराजवळील परिसरात पायवाटा बनविणे सौंदर्यीकरण करणे	२०.००
६	नविन पिण्याची पाईप लाईन टाकणे	१५.००
७	उद्वाहन जवळ दिपमालांचे सौंदर्यीकरण करणे	३५.००
८	पार्किंग एरिया बनविणे व सौंदर्यीकरण करणे	३०.००
	एकूण	**२००.००**

३. या शासन निर्णयान्वये देण्यात येणारी मंजुरी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून देण्यात येत आहे :-

अटी व शर्ती :-

१) प्रकल्पासाठी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर झाल्यानंतर व तो रितसर उपलब्ध झाल्यानंतरच याबाबतचा खर्च करण्यात यावा.

२) मालमत्तेच्या देखभाल व दुरुस्तीसाठी स्वतंत्र निधी पर्यटन विभागामार्फत दिला जाणार नाही. योजनेतर स्वरुपाच्या कामासाठी (देखभाल/दुरुस्ती इ.) सदरची तरतूद उपयोगात आणली जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

३) वितरीत केलेल्या निधीतून खर्च करताना वित्तीय नियमांचे आणि विविध नियमांतर्गत नेमून दिलेल्या कार्यपध्दतीचे पालन करण्यात यावे.

४) कोणत्याही परिस्थितीत मंजूर अनुदानापेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. मंजूर अनुदानापेक्षा जादा खर्च झाल्यास त्यासाठी जास्तीचे अनुदान उपलब्ध करुन दिले जाणार नाही. जादा खर्चाची जबाबदारी जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांची राहील.

५) मंजूर तरतुदीतून करावयाचा खर्च संबंधित वित्तीय वर्षाच्या दिनांक ३१ मार्च पर्यंत करण्यात यावा व मंजूर कामे तात्काळ पूर्ण करावीत.

६) ज्या संदर्भात निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे, त्या प्रत्येक योजनेच्या संदर्भात वित्तीय अधिकाराच्या प्रत्यावर्तनानुसार सक्षम प्राधिका-यांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

७) तांत्रिक मान्यता विहित स्तरावर घेण्यात यावी.

८) सदर प्रकल्पाबाबतच्या खरेदी प्रक्रियेसंदर्भातील कार्यपध्दतीची नियमपुस्तिका, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णय, क्रमांक- भांखस ०२१४/प्र.क्र. ८०/भाग ३/उद्योग ४, दिनांक १.१०.२०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनेतील अटी व शर्तींचे पालन करुन खरेदीविषयक कार्यवाही करावी. प्रकल्पाबाबतच्या निधीचे वितरण इलेक्ट्रॉनिक्स क्लिअरन्स सिस्टमद्वारे (ECS) करण्यात यावी.

९) अशा प्रत्येक योजनेबाबत करावयाच्या बांधकामासंदर्भात अथवा खरेदीबाबत किंवा सेवा पुरवठा कराराबाबत वित्तीय नियमांप्रमाणे आवश्यक ती कार्यपध्दती पाळणे आवश्यक आहे. या संदर्भात शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक-संकीर्ण-१००२/प्र.क्र.१५/कोषा-प्र ५, दिनांक ६.२.२००२ च्या सूचनांचे काटेकोरपणे पालन होईल याची खबरदारी संबंधित अंमलबजावणी यंत्रणेने घ्यावी. तसेच शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-बीजीटी-१०.००/प्र.क्र.५६/२०००/वित्तीय सुधारणा, दिनांक १०.९.२००१ मधील उपाययोजनांची अंमलबजावणी तंतोतंत करण्यात यावी.

१०) आवश्यक असलेल्या कामांबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमावलीचे पालन करणे बंधनकारक राहील.

११) सदर प्रकरणी योग्य त्या अधिकारी किंवा संस्थेकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

१२) प्रकल्प सल्लागाराची नियुक्ती जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी नियमानुसार करावी.

१३) प्रकल्पातील कामांची भौतिक प्रगती तसेच प्राप्त निधीतून होणा-या खर्चाची मासिक विवरणपत्रे दर महिन्याच्या १० तारखेपर्यात शासनास न चुकता सादर करावीत. तसेच काम पूर्ण झाल्यानंतर पूर्णत्वाचा दाखला आणि निधीबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र न चुकता जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्यामार्फत पर्यटन विभागास सादर करावे.

१४) सदर काम पूर्ण झाल्यानंतर सदर कामाच्या देखभालाची तसेच इतर अनुषंगिक कामांची जबाबदारी जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांची राहील.

१५) प्राप्त निधीची उपयोगिता प्रमाणपत्रे शासनास व महालेखापाल कार्यालयास सादर करणे तसेच कामाचे पूर्णत्वाचे प्रमाणपत्र देणे इत्यादीची जबाबदारी जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांची राहील.

१६) सदर योजना राबविण्यात नियोजन विभागाकडील योजनांतर्गत योजनांबाबतची कार्यपद्धती लागू राहील.

१७) सदर कामांपैकी जी कामे तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी प्रस्तावित करुन देवस्थान/संस्थेच्या जागेवर करण्यात येणार आहेत, अशा कामांसंदर्भात सदर देवस्थान/संस्थेकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील. तसेच अशा कामाच्या पूर्णत्वानंतर त्या संदर्भातील देखभाल/दुरुस्ती, संबंधित संस्थेने करण्यासंदर्भात जिल्हाधिका-यांनी संबंधित देवस्थान / संस्थेबरोबर करारनामा करणे बंधनकारक राहील. अशा प्रकारच्या देखभाल दुरुस्तीकरिता शासनाकडून यापुढे कोणत्याही प्रकारचा निधी उपलब्ध करुन दिला जाणार नाही, याची नोंद घेण्यात यावी व तशी अट करारात अंतर्भूत करण्यात यावी. तसेच या कामामुळे निर्माण होणाऱ्या सर्व सुविधा तसेच पर्यटनस्थळ सर्व नागरिकांसाठी खुले राहील, अशी अट करारात समाविष्ट करण्यात यावी.

१८) सदर काम पूर्ण झाल्यानंतर सदर कामाच्या देखभालाची तसेच इतर अनुषंगिक कामांची जबाबदारी जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्याबरोबरच सार्वजनिक बांधकाम विभाग व संबंधित संस्था यांची राहील.

४. वर नमूद करण्यात आलेला खर्च हा सन २०१७-१८ या वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून मुख्यलेखाशीर्ष "मागणी क्रमांक झेडडी-४, ३४५२-पर्यटन, पर्यटनासाठी पायाभूत सुविधा, १०१ पर्यटन केंद्रे (०२) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - राज्य योजनांतर्गत योजना, (०२) (१८) पर्यटन विकासासाठी विविध ठिकाणांसाठी मूलभूत सुविधांकरीता अनुदान (३४५२ १९५८) ३१ सहायक अनुदान" या लेखा शिर्षाखाली मंजुर तरतूदीमधून भागविण्यात यावा. या प्रकरणी मंजूर करण्यात आलेल्या (प्रादेशिक पर्यटन योजनेंतर्गत) सहायक अनुदानाची रक्कम आहरण करुन संबंधितांना वितरीत करण्याकरीता संबंधित सहायक जिल्हा नियोजन अधिकारी/ जिल्हा नियोजन अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून व संबंधित जिल्हाधिकारी यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर निर्णयानुसार मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाची रक्कम संबंधित जिल्हा कोषागार कार्यालयात देयके सादर करुन संबंधितांना रक्कम वितरीत करण्यात यावी.

५. हा शासन निर्णय, वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक-अर्थस-२०१६/प्र.क्र.८९/अर्थ-३, दिनांक २०.४.२०१६ व दिनांक ८.२.२०१७ तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग-पहिला, उप विभाग एक अ.क्र.२७ नियम क्रमांक-१४९ प्रशासकीय विभागांना दिलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा सकेतांक २०१९०३०५१२३४१७५८२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Ravindra
Laxmikant
Lakhote

Digitally signed by Ravindra Laxmikant Lakhote
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tourism And Cultural Affairs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ae5e5678dc8c9d9c01f7043448a53f6a9fbe81e46d183af43c9a9e01eb42c7c7, serialNumber=93c11f919f0c5fba6953b4841cc8cfd46b2b788da139e3f21b3d79d2cf976efa, cn=Ravindra Laxmikant Lakhote
Date: 2019.03.05 12:37:22 +05'30'

(र. ल. लखोटे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) महालेखापाल, महाराष्ट्र - १, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
२) महालेखापाल, महाराष्ट्र - २, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), नागपूर

३) महालेखापाल, (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा), मुंबई.
४) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.
५) जिल्हाधिकारी, मुंबई शहर.
६) जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई शहर.
७) जिल्हा नियोजन अधिकारी, नाशिक.
८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
९) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१०) नियोजन विभाग (कार्यासन-१४११/१४४४), मंत्रालय, मुंबई.
११) वित्त विभाग (का.व्यय-१४/अर्थोपाय / अर्थसंकल्प) मंत्रालय, मुंबई.
१२) अवर सचिव, (अर्थसंकल्प शाखा) पर्यटन व सांस्कृतिक विभाग,मंत्रालय, मुंबई.
१३) निवड नस्ती, कार्यासन-पर्यटन.

***